make food
affordable for
everyone /
إجعل طعام
بأسعار معقولة
لكل أشخاص /
在公园和公交
上的长椅上放
置毛绒座 / put
plush seats
on park and
bus benches
/ idøm folk,
der smider
affald fra sig, en bøde /
לבנות שירותים ציבוריים נקיים /
มีโครงการศิลปินพานักในสวน
สาธารณะทุกแห่ง / werk en
woon
in de-
zelfde
gemeen-
schap /
create more
comfortable
shelters for
the homeless
population /
tocar música clásica
en el metro / فواره های
بیشتری نصب کنید /
hupen durch Gesetze un-
terbinden /
parlez avec
l'étranger à
côté de vous /
छतबगीचों द्वारा
बारिश के पानी
को जमा करना /
Avere più
eventi artistici
gratuiti per
tutti / 歩行者用
の通りと自転
車専用道路
を、全部道路
より高く建設
する / plant
fruit-bearing
trees at street
level / altyapı
sistemlerini
tamamen ye-
niden tasar-
layarak /
ṣẹ̀dá bọ́sì tí
àwọn èrò ọkọ̀
ṣatọ́kùn rẹ̀ /
रस्त्याच्या काठे
ला फळझाडे
लावणे / create
buses that
are powered
by the pas-
senger /
ustawmy
wokół miasta
więcej kosz-
ów na re-
cyklizację /
criar arte pú-
blica em áreas
negligenciadas /
给无家可归的人提
供更多的庇护
所 / расши-
рить пеше-
ходные зоны /
dùng kỹ thuật
để tạo ra các
dạng thức mới về
sự cam kết
của công dân
/ build under-
ground instead of
above ground /
뜻밖의 장소에 작은
쉼터를 만들자


**BMW**
GUGGENHEIM
LAB

**News Release**


**Advisory Committee**
Daniel Barenboim
Elizabeth Diller
Nicholas Humphrey
Muchadeyi Ashton Masunda
Enrique Peñalosa
Juliet Schor
Rirkrit Tiravanija
Geetam Tiwari
Wang Shi


# बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबने '१०० अर्बन ट्रेण्ड्स: ए ग्लॉसरी ऑफ अर्बन ट्रेण्ड्स फ्रॉम द बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅब'च्या न्यूयॉर्क आणि मुंबई लॅब आवृत्त्या प्रसिद्ध केल्या

**११ ऑक्टोबर २०१३ ते ५ जानेवारी २०१४ दरम्यान न्यूयॉर्कमधील सोलोमन आर. गूगेनहाइम म्युझियममध्ये भरणाऱ्या बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅब प्रदर्शनामध्ये न्यूयॉर्क, बर्लिन व मुंबई लॅब्समधील १०० शहरी कलांचे सादरीकरण करण्यात येणार**

**तत्संबंधित ब्लॉग मालिका आज दाखल होणार**

**न्यूयॉर्क, २२ मे २०१३:** आज बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबने १०० अर्बन ट्रेण्ड्स: ए ग्लॉसरी ऑफ आयडीयाज फ्रॉम द बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅब न्यूयॉर्क आणि १०० अर्बन ट्रेण्ड्स: अ ग्लॉसरी ऑफ आयडीयाज फ्रॉम द बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅब मुंबई या आवृत्त्या प्रसिद्ध झाल्याची घोषणा केली. नोव्हेंबर २०१२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या बर्लिन लॅबमधील निरीक्षणांशी अनुरुप अशा या न्यूयॉर्क आणि मुंबई आवृत्त्यांनी लॅबच्या आतापर्यंतच्या तीन जागतिक थांब्यांमधील बहुचर्चित शहरी कलांचे प्रदर्शन करणाऱ्या संदर्भसूचीची मालिका पूर्ण झाली आहे. यामुळे शहरातील व्यक्ती शहराशी कोणत्या तऱ्हेने जोडल्या जातात आणि त्या कशा प्रकारे राहतात, याबद्दलची माहिती मिळण्याचा नवा स्त्रोत उपलब्ध होणार आहे. लॅबच्या क्युरेटर मारिया निकेनॉर, क्युरेटोरीयल सहाय्यक अमारा अँटीला आणि स्टेफानी क्वाई आणि लॅबच्या निवासी लेखिका क्रिस्टीन मॅकलॉरेन यांनी लिहिलेल्या तिन्ही संदर्भसूची 100urbantrends.org येथे कलेक्टीव्ह असेम्ब्लीने डिझाईन केलेल्या एका गतीमान सुसंवादी वैशिष्टयाच्या माध्यमातून उपलब्ध आहेत. ग्राफीक डिझायनर्स सल्की आणि मिन यांनी डिझाईन केलेल्या या संदर्भसूची बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबच्या वेबसाईट वर देखील उपलब्ध आहेत.


**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबचे डिझाईन जगभरातील शहरांतील महत्त्वपूर्ण शहरी आव्हानांबद्दल जागरुकता निर्माण करणे आणि त्यांच्याबद्दल चर्चा घडवून आणण्याच्या उद्देशाने करण्यात आले आहे. कन्फ्रंटींग कम्फर्ट या थीमवर भर दिलेल्या आणि न्यूयॉर्कमध्ये दाखल करण्यात आलेल्या लॅबने (३ ऑगस्ट - १६ ऑक्टोबर, २०११) बर्लिनमध्ये प्रवास केला (१५ जून - २९ जुलै, २०१२) जिथे शहरांना आकाराला आणण्यामध्ये नागरीकांच्या सक्रीय सहभागावर भर देणारे कार्यक्रम दाखल करण्यात आले होते. त्यानंतर ही लॅब मुंबईतील अनेक ठिकाणी दाखल करण्यात आली (९ डिसेंबर - २० जानेवारी २०१३) ज्यामध्ये खाजगीपण आणि सार्वजनिक जागा यांच्याबद्दलच्या दृष्टीकोनाचा शोध घेण्याकरिता अनेक प्रकल्प आणि कार्यक्रम राबवण्यात आले होते.

सोलोमन आर. गूगेनहाईम म्युझियम आणि फाऊंडेशनचे संचालक रिचर्ड आर्मस्ट्रॉंग म्हणाले, “या संदर्भसूचीचा उद्देश लॅबने सुरु केलेल्या चर्चेला पुढे घेऊन जाणे हा आहे. यातून या तीन शहरांच्या विश्लेषणाला आणि या शहरांच्या शहरी पर्यावरणाच्या तुलनेला प्रोत्साहन मिळेल. शहराची संकल्पना एक कल्पना केंद्र म्हणून केली जाणे हे या संदर्भसूचीशी एकात्मिक आहे आणि यातून लॅबने नागरीक व तज्ज्ञ यांना त्यांच्या शहरांबद्दल वाटणाऱ्या समान मतांना कसे बद्ध केले आहे हेच दिसते. ”

संदर्भसूचीमध्ये खालील कलांचा समावेश आहे. त्याबरोबर या कलाशी संबंधित लॅब कार्यक्रम आणि संबंधित संज्ञांची यादी पुढीलप्रमाणे:

- **१०,००० हॉंक्स**: मुंबई लॅबला भेट देणारा सेलिब्रिटी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने कार खरेदी केल्यापासून फक्त १०,०००वेळा कर्णा वाजवण्याची मर्यादा घातली जावी असा नियम बनवण्याची सूचना केली होती. या नियमामुळे मुंबईच्या रस्त्यांवरील ध्वनी प्रदूषणाला आळा घातला जाईल आणि कर्णे वाजवण्याची मर्यादा ओलांडली गेल्याने चालकांना सरकारकडून अतिरिक्त कर्णे खरेदी करणे भाग पडल्याने शहरातील ध्वनी प्रदूषणाला आळा घालणाऱ्या प्रकल्पांकरिता निधी उभारणी करण्यात मदत होईल. (मुंबई)
- **ग्लोकॅलिझम**: ‘‘लोकल’’ आणि ‘‘ग्लोबल’’ यांचा मेळ घातला जाऊन बनलेली ही संज्ञा सर्व शेजारीपाजारांमध्ये अस्तित्वात असलेल्या दोन शक्तींविषयी भाष्य करते. जलद गतीने होणारे जागतिकीकरण आणि बहुराष्ट्रीय कॉर्पोरेशन्स यांनी तयार केलेल्या पर्यावरणामध्ये कोणत्याही कॉस्मोपॉलिटन क्लबमध्ये दिसणारा सार्वत्रिक सारखेपणा जाणवतो आहे. याचाच व्यत्यास म्हणजे प्रत्येक शहराची आपली अशी एक स्थानिक आणि भाषिक परंपरा असते. ग्लोकॅलिझम म्हणजे या परस्परविरोधी वाटणाऱ्या दोन शक्तींना एकत्र आणणे. (न्यूयॉर्क)
- **पायाभूत सुविधांचे रेट्रोफिटींग**: महत्तम संस्थात्मक पायाभूत सुविधांची (उदा.- परिवाहन, पाणी, सांडपाणी आणि वीज) पुनर्कल्पना करणे. जगातील एकूण लोकसंख्येपैकी अर्धी लोकसंख्या शहरांमध्ये राहते. शहरे ही उपनगरांपेक्षा अधिक ऊर्जा कार्यक्षम असली तरी त्यांना दीर्घकालीन राहणीमानास भेडसावणाऱ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. रहिवासी आणि व्यवसाय यांच्या महत्त्वपूर्ण गरजांची पूर्तता करणाऱ्या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा आधीपासून स्थापित असणे हे त्याचे मुख्य कारण होय. शहरातील राहणीमानात सुधारणा घडवून आणण्याकरिता आधीपासून अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधा जमीनदोस्त करण्यावर

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

अतिरिक्त ऊर्जा, संसाधने आणि निधी खर्च करण्यापेक्षा पायाभूत सुविधांचे रेट्रोफिटींग हा पर्यायी उपाय म्हणून वापरला जाऊ शकतो. (मुंबई)

**पार्टीसिपेटरी सिटी: १०० अर्बन ट्रेण्ड्स फ्रॉम द बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅब**

पार्टीसिपेटरी सिटी: १०० अर्बन ट्रेण्ड्स फ्रॉम द बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबचे उद्घाटन ११ ऑक्टोबर २०१३ रोजी गूगेनहाईम म्युझियममध्ये होणार आहे. यांमध्ये न्यूयॉर्क, बर्लिन व मुंबई लॅब्समधील महत्त्वपूर्ण अनुभव आणि शोध यांचा आढावा घेण्यात येणार आहे. या प्रदर्शनामध्ये प्रत्येक शहरामधील लॅबमधून आकाराला आलेल्या बहुचर्चित थीम्स आणि कल्पना मांडल्या जाणार आहेत. जगभरातील ५० शहरांतील वास्तुविशारद, शिक्षणतज्ज्ञ, डिझायनर्स, कलाकार व इतर आमंत्रित पाहुणे संदर्भसूचीतील १०० कलांपैकी ५० कलांवर आधारित असलेली आणि त्यांच्यावर भाष्य करणारी  ड्रॉईंग्ज, स्केचेस, शॉर्ट व्हिडीयोज किंवा डिजिटल फिती सुपूर्द करतील. उर्वरित ५० कल लॅबचे कार्यक्रम आणि प्रकल्पांच्या उदाहरणांच्या माध्यमातून सादर केले जातील.

लॅबच्या क्युरेटर मारिया निकॅनोर म्हणाल्या, “२०११ आणि २०१३ मध्ये विशिष्ट कालावधीमध्ये न्यूयॉर्क, बर्लिन आणि मुंबई मधील तापमानाची नोंद करणे आणि शहराचे वर्तमान व भविष्य याकरिता शहर तज्ज्ञ आणि तज्ज्ञेतर मंडळींनी मांडलेल्या कल्पनांना समजून घेणे हे या प्रदर्शनाचे उद्दिष्ट आहे. लॅबने भेटी दिलेल्या शहरांतील निरीक्षणांकडे आणि इतर जागतिक शहरी केंद्रांकडून आलेल्या कल्पनांना पाहताना आम्हाला आजच्या काळातील शहरांचे सर्वांगीण ज्ञान मिळण्यास मदत होत आहे.”

**ब्लॉग मालिका**

या शोधाचा भाग म्हणून बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबचा ब्लॉग लॅब | लॉगने आज शहरी कलांवर भर देणारी आणि त्यावर विस्ताराने भाष्य करणारी एका आठवड्याची लेखमालिका दाखल केली. यांत सहभागी झालेल्या लेखकांमध्ये भूतपूर्व मेट्रोपोलिस संपादक आणि डेली रिच्युअल्स: हाऊ आर्टीस्ट्स वर्कचे लेखक मेसन कुरे; न्यूयॉर्क लॅबच्या कार्यक्रमांच्या व्यवस्थापिका आणि एज्युकेशन फॉर आर्ट२१च्या संचालिका रोझाना फ्लाऊटील; पत्रकार व अटलांटीस सिटीजकरिता लेखन करणाऱ्या सारा गुडईयर; लॅटीन लॅबच्या कार्यक्रमांचे समन्वयक आणि कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या नियोजन व संवर्धन विभागाचे आणि ग्रॅज्युएट स्कूल ऑफ आर्कीटेक्चरचे ॲडजंक्ट सहाय्यक प्राध्यापक अलेजांद्रो दे कॅस्ट्रो माझारो; लॅबच्या निवासी लेखिका क्रिस्टीन मॅकलॉरेन आणि पत्रकार आणि न्यू यॉर्क लॉबच्या टीमचे सदस्य चार्ल्स मॉंटेगोमेरी यांचा समावेश आहे.

गूगेनहाइम या उन्हाळ्यातील प्रदर्शनाचा तपशील लवकरच जाहिर करेल.

**बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबबाबत:**

सोलोमन आर. गूगेनहाइम फाऊंडेशन आणि बीएमडब्ल्यू ग्रुप यांचा बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅब हा एक संयुक्त विद्यम आहे. बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबची स्थापना सोलोमन आर. गूगेनहाइम म्युझियमच्या मारिया निकॅनोर यांनी केली आहे. प्रकल्पाच्या Lab | Log ब्लॉगवर बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबला योगदान दिलेल्या व्यक्तींच्या मुलाखती बघता येतील तसेच लॅबमधील

**Solomon R. Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

उपक्रमांविषयी जाणून घेता येईल. बीएमडब्ल्यू गूगेनहाइम लॅबच्या ट्विटरवरील (@BMWGuggLab आणि #BGLab), Facebook, YouTube, Flickr वरील समर्पित सोशल कम्युनिटीजना सामील होण्यासाठी आणि प्रकल्पा संबंधित अद्ययावत माहितीकरिता लॅबच्या ई-न्यूजलेटरला subscribe करण्यासाठी जनतेला आवाहन करण्यात आले आहे.

संपूर्ण प्रेस मटेरियलसाठी बघा bmwguggenheimlab.org/presskits
पब्लिसिटी चित्रांसाठी पाहा bmwguggenheimlab.org/pressimages
पब्लिसिटी व्हिडिओजसाठी पाहा bmwguggenheimlab.org/pressvideos
यूजर आयडी = photoservice
पासवर्ड = presspass

**संपर्क**

**आंतरराष्ट्रीय:**
लिलियन गोल्डनथॅल, पोल्स्कीन आर्ट्स अँड कम्युनिकेशन्स काऊंसिलर्स
+ 1 212 593 6355 / goldenthall@finnpartners.com

**बीएमडब्ल्यूशी संबंधित चौकशीकरिता:**
ॲल्मट स्टोलबर्ग, प्रवक्ता कल्चरल एन्गेजमेण्ट
बीएमडब्ल्यू ग्रुप कॉर्पोरेट अँड गव्हर्नमेण्ट अफेयर्स
+49 89 382 38770 / almut.stollberg@bmw.de

२२ मे, २०१३
#1299/BGL29